प्रेस नोट

दि.३०/१०/२०२६

'' एमआयडीसी पोलीस ठाणेकडुन 'हायड्रो गांजा' या अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या दोन आरोपीस अटक करून त्यांच्याकडून ०१ किलो ८९६ ग्रॅम वजन अं.कि.रू. ६६,३६,०००/- चा अंमली पदार्थ हस्तगत केलेबाबत ''

एमआयडीसी पोलीस ठाणेचे पोलीस उपनिरीक्षक रणजीत गोंदुकुप्पे व अंमली पदार्थ विरोधी पथक हे पोलीस ठाणे हद्दीत अंमली पदार्थ सेवन, खरेदी व विक्री करणाऱ्या इसमांविरूध्द कारवाई करण्याकरीता दिनांक २९/१०/२०२६ रोजी गस्त करीत होते. त्यावेळी १९:५० वाजताचे सुमारास जे.के. इंडस्ट्रीयल ईस्टेटच्या जवळ, पेपर बॉक्स रोड, एमआयडीसी, अंधेरी (पुर्व), मुंबई या ठिकाणी दोन इसम हे संशयास्पद फिरत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यावरून पोलीस उपनिरीक्षक गोंदुकुप्पे यांना त्याच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पोउनि गोंदुकुप्पे व पोलीस पथकाने त्यांना हटकले असता एक इमस हा त्यांच्या हातातील लाल कलरची प्लॅस्टीकची बॅग लपवून दोन्ही इसम हे त्या ठिकाणाहून घाई गडबडीनी पोलीसांना टाळून निघुन जाण्याचा प्रयत्न करू लागले म्हणून त्यास पोलीस पथकाच्या मदतीने जागीच अटकाव करण्यात आला. सदर वेळी पोउनि गोंदुकुप्पे यांनी दोन्ही इसमास नमुद ठिकाणी येण्याचे व तेथुन पोलीसांना टाळून निघून जाण्याचे कारण विचारले असता त्यांनी प्रथम उडवा उडविचे उत्तरे दिली. त्यानंतर दोन्ही इसमांना विश्वासात घेवून अधिक सखोल विचारपुस केली असता त्याच्या ताब्यात 'हायड्रो गांजा' हा अंमली पदार्थ असल्याचे पोउनि गोंदुकुप्पे यांना सांगितले. पोउनि गोंदुकुप्पे यांनी एनडीपीएस ॲक्ट १९८५ च्या सर्व नियमांचे पालन करून नमुद इसमांची अंगझडती तसेच ओमकार राजेंद्र पवार याच्याकडे असलेल्या लाल कलरच्या प्लॅस्टीकच्या पिशवीची तपासणी केली असता त्यामध्ये ०१ किलो ८९६ ग्रॅम वजन अं.कि.रू. ६६,३६,०००/- चा 'हायड्रो गांजा' हा अंमली पदार्थ मिळून आला. तरी इसम नामे १) ओमकार राजेंद्र पवार, वय २८ वर्षे, रा.ठि.- मु.पो. भाकरवाडी, ता. कोरेगांव, जिल्हा - सातारा, २) पियुष मधूकर घोंगडे, वय २२ वर्षे, रा.ठि.- मु.पो. वाठार स्टेशन, ता.कोरेगांव, जिल्हा - सातारा हे एकूण वजन ०१ किलो ८९६ ग्रॅम, अं.कि.रू. ६६,३६,००,०००/- चा 'हायड्रो गांजा' हा अंमली पदार्थ स्वतःच्या कब्जात विक्री, वाहतुक व व्यापार यासाठी बाळगताना मिळून आले म्हणुन पोलीस पथकातील पो.ह.क्र.०६१६४५/गौतम बडे यांनी एमआयडीसी पोलीस ठाणे, मुंबई येथे दिलेल्या फिर्यादीवरून गु.र.क्र. १२४४/२०२६ कलम ८ (क),२०(ब),२९ एन.डी.पी.एस. १९८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपी हे जिल्हा सातारा येथून मुंबई शहरात 'हायड्रो गांजा' हा अंमली पदार्थ विक्री करीता आले असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे. अशा प्रकारे एमआयडीसी पोलीस ठाणेचे पोलीस उपनिरीक्षक रणजीत गोंदुकुप्पे व अंमली पदार्थ विरोधी पथक यांनी 'हायड्रो गांजा' हा अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या दोन आरोपीतास शिताफिने अटक करून त्याकडुन एकूण ०१ किलो ८९६ ग्रॅम वजन अं.कि.रू. ६६,३६,०००/- किंमतीचा 'हायड्रो गांजा' अंमली पदार्थ जप्त केल्याची उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री.देवेन भारती सो, मा.पोलीस सह आयुक्त (का.व सु.), बृहन्मुंबई डॉ.श्री. मनोजकुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, डॉ.श्री. अभिनव देशमुख, पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ-०३, मुंबई श्री. दत्ता नलावडे, सहायक पोलीस आयुक्त, अंधेरी विभाग, श्री. योगेश शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक घनश्याम नायर व पोलीस निरीक्षक गुन्हे सुनिल करांडे यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली पोलीस उप निरीक्षक रणजीत गोंदुकुप्पे, पो.ह.गौतम बडे, पो.ह. बाबू येडगे, पो.ह.सचिन ठोंबरे, पो.शि. लोखंडे व पो.शि. बिनल शिंगाणे यांनी पार पाडलेली आहे.